# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि – ४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

विशेष मागासवर्ग कक्ष

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५ फोन नं. ०७१३२ - २१६५९६

जावक क्रमांक : गों.वि./वि.मा.क./६९/४८ /२०१५ दिनांक :- २६/०८/२०१५

**प्रति,**

**मा. प्राचार्य/ मा. संचालक**

**गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीशी**

**संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.**

**विषय :- राज्यातील अकृषी विद्यापीठे / शासकिय महाविद्यालये / संस्था, अशासकिय अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकिय पदांच्या आरक्षणाबाबत.**

**संदर्भ :-** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१४ (प्र.क्र. ३२१/१४)/विशि-१, दिनांक २४ ऑगस्ट, २०१५.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाकिंत शासन निर्णयाच्या अनुषंगाने विषयांकित बाबतीत कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१४ (प्र.क्र. ३२१/१४)/विशि-१, दिनांक २४ ऑगस्ट, २०१५. रोजीची प्रत आपले माहिती व तात्काळ कार्यवाहिस्तव सोबत संलग्नित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणेच यापूढे बिंदुनामावली प्रमाणित करण्याची कार्यवाही घेण्यात यावी.

कळावे.

(डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

सहपत्र :-

१. संदर्भीय शासन निर्णयाची प्रत.
२. बिंदुनामावलीची प्रत.

F:\Letters\01

राज्यातील अकृषी विद्यापीठे / शासकीय महाविद्यालये / संस्था, अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या आरक्षणाबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन निर्णय क्रमांकः न्यायाप्र-२०१४/(प्र.क्र.३२१/१४)/विशि-१,**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२

तारीख: २४ ऑगस्ट, २०१५

<u>संदर्भ :-</u>

१) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक:- एनजीसी-१४१४/(२९९१)/ विशि-४, दि.२४.४.१९९५.

२) शासन पत्र क्रमांक एनजीसी-१४९४/(२९९१)विशि-४, दि.६.२.१९९६.

३) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/ १६-ब, दि.१८.१०.१९९७.

४) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक :- यूएसजी १४९५/(३१८३)/ विशि-४, दि.०८.१२.१९९७.

५) शासन परिपत्रक क्र.बीसीसी २००९/(प्र.क्र.२९१/०९)/१६-ब, दि.०५.११.२००९

६) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक:-२०१३/(४४७/१३)/विशि-१, दि.२२.१.२०१४.

७) शासन शुध्दीपत्रक क्र.२०१३/(४४७/१३)/विशि-१, दि. ०४ मार्च, २०१४.

८) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग,क्रमांक: न्यायाप्र२०१४/(प्र.क्र. ३२१/ १४)/विशि-१, दि.१०.०४.२०१५.

<u>प्रस्तावना —</u>

शासकीय महाविद्यालयातील महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ मधील अधिव्याख्यात्यांनी महाविद्यालयातील अधिव्याख्याता पदावर नियुक्ती करताना विषय निहाय आरक्षण लागू करण्याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका क्र. १००४/१९८९ दाखल केली होती. सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिनांक २४.४.१९९० रोजी विषय निहाय आरक्षण ठेवण्याबाबतचे आदेश दिले होते. सदर आदेशाविरुध्द शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च

न्यायालयाने खारीज करुन उच्च न्यायालयाचे आदेश कायम केले. त्यानुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षण शास्त्र इत्यादी महाविद्यालयातील शिक्षक पदे भरण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णय क्रमांक एनजीसी-१४९४/(२९९१)/ विशि-४, दि.२४.४.१९९५ अन्वये संवर्ग व विषय निहाय आरक्षण लागू केले होते.

२. वर नमूद केलेल्या दि.२४.४.१९९५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे संवर्ग व विषय निहाय आरक्षणाच्या धोरणामुळे सामाजिक आरक्षणातील सर्व मागासवर्गीय प्रवर्गांना त्याचा लाभ होत नसल्याचे व त्यामुळे शिक्षक पदास विषय निहाय आरक्षणाच्या ऐवजी संवर्ग निहाय आरक्षण लागू करण्यात यावे, अशी मागणी विविध स्तरावरुन शासनाकडे करण्यात आली. त्यामुळे यासंदर्भात सर्वसमावेशक सामाजिक आरक्षण धोरण ठरविण्यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय क्रमांक २०१३/(४४७/१३) विशि-१, दि.२२.१.२०१४ अन्वये विषय निहाय आरक्षणा ऐवजी संवर्ग निहाय आरक्षण लागू केले. त्याविरोधात स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या याचिका क्रमांक १६८०/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २०.११.२०१४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.६ येथील दि.२२.०१.२०१४ अन्वये घेण्यात आलेल्या शासन निर्णयाला संदर्भाधीन क्र.८ येथील दि.१०.०४.२०१५ च्या शासन निर्णयान्वये स्थगिती देण्यात आली होती. मा.उच्च न्यायालयाच्या दि.२०.११.२०१४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शासन निर्णय दि.२२.०१.२०१४ मध्ये बदल करण्यात यावा किंवा कसे, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय—**

संदर्भाधीन क्र.६ येथे नमूद केलेला दि.२२.०१.२०१४ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन राज्यातील अकृषी विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/संस्था, अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांसाठी शासन निर्णय क्रमांक एनजीसी-१४९४/(२९९१)/विशि-४, दि.२४.४.१९९५ अन्वये घेण्यात आलेला संवर्ग व विषय निहाय आरक्षण ठेवण्याबाबतचा निर्णय कायम ठेवण्यात येत आहे.

२. आरक्षण निश्चित करताना, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.०२/९७/१६-ब, दि.२९.०३.१९९७ नुसार विहीत केलेल्या १०० बिंदू नामावलीनुसार संवर्ग व विषय निहाय बिंदू नामावल्या तयार करुन शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५.११.२००९ सोबतच्या प्रपत्र अ मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्याकडून त्या प्रमाणित करुन घ्याव्यात.

३. सदरचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या (मागास वर्ग कक्ष-१६ब) यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८२४१५४८३६२१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Rambhau Kharat

Digitally signed by Siddharth Rambhau Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Siddharth Rambhau Kharat
Date: 2015.08.25 15:16:10 +05'30'

**( सिध्दार्थ खरात )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु,
५. सर्व विभागीय आयुक्त, (मा.व क.)
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव,
८. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
१०.महालेखापाल (लेखा परिक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई ( ५ प्रती),
११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
१२.महालेखापाल (लेखा परिक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर ( ५ प्रती),
१३.संचालक, लेखा व कोषागारे, (५ प्रती),
१४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१६.सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई,
१७.सामान्य प्रशासन विभाग, (१६ ब)
१८.विधी व न्याय विभाग,
१९.निवड नस्ती.

## कुलसचिव गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचे कडून
## मागासवर्ग विशेष विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा प्राथमिक तपासणी अहवाल

**संस्थेचे नांव :–**
**महाविद्यालयाचे नांव :–**
**येथील बिंदूनामावलीच्या विषयाचे अनुषंगाने प्राथमिक तपासणीतील खालील मुद्यांवरील अभिप्राय देण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| ०१ | संस्थेकडे असलेले एकुण महाविद्यालयांची संख्या | |
| ०२ | संवर्गाचे नाव :– | |
| ०३ | संस्थेकडील/महाविद्यालयाकडील एकुण मंजुर पदे | |
| ०४ | प्रत्यक्षात भरण्यात आलेली पदे | |
| ०५ | प्राथमिक तपासणीत कर्मचाऱ्यांचे नियुक्ती संवर्ग, प्रवर्ग तसेच नियुक्ती दिनांक हे दर्शविल्यानुसार व शासकिय अभिलेखानुसार योग्य आहे काय? | |
| ०६ | ज्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन संस्थेत/महाविद्यालयात करण्यात आले आहे, त्यांचे अभिलेखानुसार मुळ संस्थेतील नियुक्ती प्रवर्ग अभिलेखात दर्शविण्यात आले आहे काय? | – |
| ०७ | असल्यास ते योग्य आहे काय? | – |
| ०८ | नामावली संबंधी विशेष बाबी/शेरा | |

१. सामान्य प्रशासन विभाग निर्णय क. बीसीसी –१०९७/प्र.क्र.२/९७/१६ ब. दिनांक २९ मार्च १९९७ नुसार १०० टक्के बिंदु नामावली (सरळ सेवा भरती)

२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क. न्यायाप्र–२०१४/(प्र.क्र. ३२१/१४)/विशि–१ दिनांक २४ ऑगस्ट, २०१५

संस्थेचे नांव:–

महाविद्यालयाचे नाव:–

संवर्ग :–

दिनांक रोजी आरक्षणानुसार पदधारकांची संख्या:–

दिनांक________________ची स्थिती

| संवर्ग | मंजुर पदांची संख्या | अ. जा. १३% | अ. ज. ७% | वि.जा. (अ) ३% | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५% | भ.ज. (ड) २% | एकुण अबकड ११% | विमाप्र २% | इमाव १९% | खुला ४८% | एकुण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | टक्केवारीनुसार आवश्यक आरक्षण | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| | कार्यरत कर्मचारी | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| | कमी किवा जास्त अनुशेष | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |

प्रमाणपत्र देण्यात येते की, दि.____________रोजी महाविद्यालयाच्या__________संवर्गातील एकुण कर्मचारी कार्यरत असुन वरील नमुद केलेली माहीती महाविद्यालयाच्या अभिलेखावरून तसेच सेवापुस्तकावरून तपासुन पाहिली व ती बरोबर आहे.

दिनांक____________रोजी कार्यरत कर्मचाऱ्यांची यादी

**अ.जा.**

| अ.क्र. | नाव | नियुक्ती दिनांक | जात | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | | | | |

**अ.ज.**

| अ.क्र. | नाव | नियुक्ती दिनांक | जात | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | | | | |

**खुले**

| अ.क्र. | नाव | नियुक्ती दिनांक | जात | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | | | | |